समर कॅम्प 2019.......

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## शिक्षण-समग्र शिक्षा विभाग

# समर कॅम्प नियोजन




**एप्रिल, 2019**

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

## ➢प्रस्तावना :

पुढील शैक्षणिक वर्ष 2019-20 ला सामोरे जाण्याच्या पहिले महानगरपालिकेच्या शाळेतील पटसंख्या आणि गुणवत्ता वाढविण्याकरिता शाळा पूर्व तयारी ही परीक्षा झाल्याबरोबरच करणे अपेक्षित आहे. सन 2018-19 मध्ये राबविण्यात आलेले विविध उपक्रम त्या मध्ये विशेष करुन महानगरपालिकेच्या शाळेत बालोद्यान निर्मिती, मुठभर गोष्टीचे व शिकू आनंदे हे उपक्रमशील पुस्तके तसेच वर्ग निहाय ग्रंथालयीन पुस्तकांचा पुरवठा केल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलत चाललेला आहे. शाळेचे वातावरण बालोद्यान मुळे बदललेले दिसून येत आहे आणि विद्यार्थी शाळेकडे आकर्षित होत आहेत आणि हे वातावरण टिकविण्याकरिता मोठ्या इंग्रजी माध्यमाच्या व CBSC पॅटर्नच्या शाळेमध्ये ज्या प्रमाणे परीक्षा झाल्याबरोबर पुढच्या वर्गाची तयारी सुरु होते त्या धर्तीवर महानगरपालिकेच्या शाळेत मा. आयुक्त महोद्‌य यांच्या संकल्पनेतून एप्रिल, 2019 मध्ये समर कॅम्प चे आयोजन करण्यात येत आहे.

## ➢ उद्देश :

- ✓ शिक्षणापासून मुले दुर जाणार नाहीत.
- ✓ महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांना आनंददायी वातावरणात शिक्षण मिळेल.
- ✓ शालेय अभ्यासक्रमाशिवाय इतर बाबी शिकण्यास मिळतील.
- ✓ महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षकांचे मनोबल वाढेल.
- ✓ शैक्षणिक वर्ष 2019-20 साठी मुलांची प्रवेश वाढतील
- ✓ अध्ययनात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांबरोबर आणता येईल.
- ✓ कला, क्रीडा व कार्यानुभव या विषयावर भर देऊन विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास करता येईल.
- ✓ समर कॅम्प च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध गुण दर्शनाची संधी मिळले.
- ✓ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधता येईल.

# ➢ आयोजन :

समर कॅम्प महानगरपालिकेच्या एकूण 72 शाळापैकी 30 शाळास्तरावर **सकाळी** 7.30 **ते** 11.30 या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. उर्वरित शाळेचे शिक्षक व विद्यार्थी नजीकच्या समर कॅम्प केंद्रावर समायोजित करण्यात आलेले आहेत. समर कॅम्प पासून एकही शाळा व विद्यार्थी वंचित राहणार नाही व त्याला समर कॅम्प मधील सर्व विषयाची व सर्व उपक्रमामध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने समर कॅम्प 30 शाळामध्ये आयोजित करण्यात आलेला आहे. या समर कॅम्प मध्ये एकूण 3 गट तयार करण्यात आले असून,

- ✓ **पहिला गट : इ.1ली व 2री**
- ✓ **दुसरा गट : इ.3री ते 5वी**
- ✓ **तिसरा गट : 6वी ते 8वी**

सदर समर कॅम्प मध्ये भाषा, गणित व विज्ञान तसेच कला, क्रीडा व कार्यानुभव या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे व या विषयावर आधारित प्रत्येक दिवसाची वेगवेगळी थीम करण्यात आलेली आहे.

# ➢ विविध उपक्रम :

## ✓ पत्र लेखन (निमंत्रण पत्र):

महानगरपालिकेच्या शाळेत प्रथमत:च समर कॅम्चे आयोजन करण्यात येत असल्यामुळे **दिनांक** 08.04.2019 रोजी सर्व विद्यार्थ्यांकडून आपल्या आई-वडीलास / पालकास समर कॅम्प 2019 बाबत माहिती होण्यासाठी पालक मेळाव्यास व उद्‌घाटन आणि समारोपाच्या दिवसी उपस्थित राहण्यासाठी विनंती पत्र लेखन शाळा स्तरावर करुन घेण्यात येईल व ते पत्र विद्यार्थी आप-आपल्या पालकांना देतील.

## ➢ उद्‌घाटन समारंभ :

महानगरपालिका अंतर्गत प्रथमत:च समर कॅम्प चे आयोजन करण्यात येत आहे म्हणून या समर कॅम्पचे उद्‌घाटन **दिनांक** 10 **एप्रिल**, 2019 **रोजी सकाळी** 09.00 **वाजता** 27 **समर कॅम्प** केंद्रावर सदर कार्यक्रम आयोजित करणे. सकाळी 7.00 ते 9.00 या वेळेत उद्‌घाटनाच्या स्थळी इ.6वी ते 8वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या 100% मतदान होण्याच्या दृष्टीने मतदान जाणीव जागृती व 2030 मध्ये औरंगाबाद शहर कसे असेल या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करणे. तसेच इ.1ली ते 5वी च्या विद्यार्थ्यांच्या शाळा सुशोभीत दिसण्यासाठी पताका तयार करणे त्यावर वेगवेगळी चित्र काढून दोरी / सुतळीला चिटकवणे याबाबत उपक्रम घेण्यात येईल. उद्‌घाटन स्थळी तज्ञ व्यक्ती मार्फत विद्यार्थ्यांना समर कॅम्प मधील विषयाबाबत माहिती देण्यात येईल.

## ✓ प्रसिद्धी:

- **बॅनर** :महानगरपालिकेच्या **एकूण** 30 शाळेत समर कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे. नागरिक / पालकामध्ये समर कॅम्प बाबत जनजागृती होण्याच्या दृष्टीने मोठे बॅनर तयार करुन लावण्यात येतील.

- **जाहिरात** : स्थानिक न्यूज चॅनल त्यामध्ये विशेष करुन एमसीएन न्यूज, आकाशवाणी, रेडीओ मिर्ची इ. द्वारे समर कॅम्पचे दैनंदिन होणारे विविध उपक्रमाबाबत बातमी देणे.

- **पत्रकार परिषद** : मा. महापौर व मा. आयुक्त महोद्य यांच्या अध्यक्षतेखाली **दिनांक** 08 **एप्रिल**, 2019 **रोजी पत्रकार परिषद** घेऊन महानगरपालिकेच्या शाळेत 2018-19 मध्ये

राबविलेले उपक्रम आणि 2019-20 मध्ये राबविण्यात येणारे उपक्रम तसेच समर कॅम्पचे केलेले नियोजन याबाबत सर्व माहिती पत्रकारांना देणे. **दि**.09 **एप्रिल**, 2019 **रोजी** सर्व पालकांना / नागरिकांना महानगरपालिकेच्या शाळेत राबविण्यात येणाऱ्या समर कॅम्पची माहिती झाली पाहिजे.

- **पालक मेळावा** : समर कॅम्प आयोजन करण्याची माहिती सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना होण्यासाठी महानगरपालिकेच्या शाळेत **दिनांक** 09 **एप्रिल**, 2019 **रोजी** पालक / महिला मेळावा व शाळेच्या विविध समित्याची बैठक आयोजित करुन मुख्याध्यापक व वर्ग शिक्षक समर कॅम्प बाबत मार्गदर्शन करतील.

## ✓ कार्यशाळा / मिटींग :

समर कॅम्पचे आयोजन करण्यासाठी महानगरपालिकेच्या पर्यवेक्षकीय यंत्रणा व शाळेतील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. त्यासाठी पर्यवेक्षक व मुख्याध्यापकाची एक दिवसीय मिटींग आणि वर्ग निहाय शिक्षक व कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन निदेशकांच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत.

## ✓ भाषाविषय :

- मनपाच्या शाळेतील विद्यार्थी भाषा विषयामध्ये मागे असल्याचे विविध सर्वेक्षणातून व अध्ययन स्तर निश्चितीमधून दिसून येत आहे. त्यामुळे भाषा विषय हा नाविन्यपूर्ण प्रशिक्षणात घेतलेल्या विविध उपक्रमाच्या सहाय्याने तसचे नवनवीन थिम वापरून त्यावर आधारित केलेल्या साहित्यावर रंजक / आनंददायी पद्धतीने शिकविण्यात येईल. त्यासाठी शाळेमध्ये भाषा विषयाची पेटी उपलब्ध आहे व विविध नाविन्यपूर्ण उपक्रमासाठीआवश्यक असणारे विविध साहित्य शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी शाळेला उपलब्ध करुन देण्यात येतील.

## ✓ गणित व विज्ञान :

गणित विषय शिकण्यास सोपा आहे. परंतु दैनंदिन अभ्यासक्रमातील गणित शिकवयास गेल्यास विद्यार्थी कंटाळा करतात. म्हणून त्यांना विविध उपक्रमाच्या साहित्यद्वारे गणित विषयाबाबत विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणे. विज्ञान विषय छोटे छोटे प्रयोगाच्या माध्यमातून शिकविणे आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या शाळेत साहित्य आभावी विद्यार्थ्यांना प्रयोग करुन विज्ञान विषयात शिकता येत नाही. म्हणून समर कॅम्पमध्येविज्ञान विषय हा आनंददायी होण्याकरिता विविध छोटे छोटे प्रयोग करुन दाखवून काही वस्तू प्रत्यक्ष मुलांना हाताळण्यास दिल्याने प्रयोग पाहणे हे विज्ञान विषयातील गोडी वाढविण्यास कारणीभूत ठरतील. यासाठी आवश्यक असणारे प्रयोगाचे साहित्य ही शाळेला उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर साहित्य शाळेला पुढेही उपयोगात येतील.

## ✓ कला, क्रीडा व कार्यानुभव :

मुलांच्या संकल्पनांना व सुप्त गुणांना वाव देण्यासाठी रंगसंगतीचे ज्ञान वाढविणे पंरपरागत चित्रकलेची ओळख करुन घेणे, कागदांचे मनोरंजक उपयोग शिकविणे, सोप्या व सहज उपलब्ध असलेल्या साधनांनी वेगवेगळे हस्तकला तयार करणे तसेच मुलांच्या समान्यज्ञानाचा कक्षा रुंदावण्याकरिता कथा कथन, प्रश्न  मंजूषा, नृत्य, गायन व विविध गट तयार करुन विद्यार्थ्यांना खेळाचा माध्यमातून हे विषय शिकविले जातील. यासाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य शाळेला उपलब्ध करुन देण्यात येतील.

## ✓ समर कॅम्प उपस्थिती :

- समर कॅम्प मध्ये सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणा, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच भेट देणारे पदाधिकारी व अधिकारी यांनी पहिल्या दिवशी उपस्थिती नोंदविण्याकरिता प्रत्येक समर कॅम्प केंद्रामध्ये एक मोठे बॅनर लावण्यात येईल व या बॅनरवर महानगरपालिकेचा / वॉर्डाचा / शाळेचा नकाशा असेल. उपस्थित असलेल्या सर्वांनी प्रथमत: त्या बॅनरवर मार्कर पेनद्वारे स्वाक्षरी करुन आपली उपस्थिती नोंदवायची आहे.

## ✓ शालेय पोषण आहार:

- समर कॅम्प चे आयोजन **सकाळी** 7.30 **ते** 11.30 वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. **सकाळी** 9.30 **ते** 10.00 च्या दरम्यान विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरवठा करण्यात येणार आहे. यामध्ये दररोज वेगवेगळा मेनू असणार आहे.

## ✓ समर कॅम्प 2019 कॅप / टोपी :

- समर कॅम्प आयोजित करण्याकरिता सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, समर कॅम्प केंद्र समन्वयक व विद्यार्थीयांना एक उन्हाळी टोपी पुरवठा करणे व त्यावर **"औरंगाबाद महानगरपालिका समर कॅम्प 2019"** असे छपाई करुन देण्याचे नियोजन आहे.

## ✓ क्षेत्रीय भेट व चित्रपट दाखविणे :

- परिसरातील उद्योगांना तसेच थीमवर आधारित क्षेत्राला विद्यार्थ्यांच्या भेटी घडवून आणणे. तसेच मनोरंजक व शैक्षणिक Short Films / चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात येतील.

## ✓ समारोप :

- **दिनांक 20 एप्रिल**, 2019 रोजी सर्व समर कॅम्प केंद्र ठिकाणी पालक मिटींग आयोजित करुन समर कॅम्प कालावधीत केलेल्या वस्तूचे प्रदर्शन ठेवणे. तसेच समर कॅम्प कालावधीत शिकलेल्या बाबतचे विद्यार्थ्यांचे व पालकांचे मनोगत जाणून घेणे. तसेच शाळेच्या मुख्याध्यापकांनी सन 2019-20 या शैक्षणिक वर्षासाठी शाळेचे असलेले विविध उपक्रम नियोजन सर्व पालकांसमोर सादर करणे व सर्व पालकांना महानगरपालिकेच्या शाळेत आपले मुले-मुली प्रवेशीत करण्याबाबत आवाहन करणे.
- या दिवशी महानगरपालिकेचे एक अधिकारी प्रत्येक समर कॅम्प केंद्रावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

## ➢ समर कॅम्प केंद्र

| केंद्र क्र. | केंद्राचे नाव | अंतर्गत शाळेचे नाव | मु.अ. चे नाव | समन्वयकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | के प्रा शा बेगमपुरा | प्रा शा आरेफ कॉलनी | श्री कोल्हे व्ही.एल. | श्री दंडे के.बी. |
| 2 | प्रा शा भावसिंगपुरा | -- | श्री सोनवणे | श्री शेप आर.डी. |
| 3 | प्रा शा पडेगाव | प्रा शा पडेगाव कॉलनी | श्रीमती खंदारे एल.एम | |
| 4 | प्रा शा मिटमिटा | --- | श्रीमती हिवाळे आर.सी. | श्री पल्हाळ एस.बी. |
| 5 | के प्रा शा ज्युब्लीपार्क | प्रा शा नागेश्वरवाडी<br>प्रा शा बडीगिरणी<br>प्रा शा जुनाबाजार<br>प्रा शा पोलीस हेडक्वॉर्टर | श्री शेख आर.बी. | श्री किशोर दांडगे |
| 6 | के प्रा शा किराडपुरा नं.1 | प्रा शा किराडपुरा नं.2 | श्रीमती रिजवाना बेगम | श्री अन्सारी के.आर. |

**समर कॅम्प 2019.......**

| केंद्र क्र. | केंद्राचे नाव | अंतर्गत शाळेचे नाव | मु.अ. चे नाव | समन्वयकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 7 | प्रा शा शहाबाजार | प्रा शा चेलीपुरा नं.5<br>प्रा शा मंजूरपुरा<br>प्रा शा किराडपुरा नं.3 | श्रीमती कैसर बेगम | श्री सिसोदे एस.एन. |
| 8 | प्रा शा यशोधरा कॉलनी | प्रा शा यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती शोभा सोनखेडे | श्री नन्नवरे लक्ष्मीकांत |
| 9 | के प्रा शा सिडको एन-12 | प्रा शा रोजाबाग<br>प्रा शा शताब्दीनगर<br>प्रा शा गणेश कॉलनी<br>प्रा शा सिडको एन-11<br>प्रा शा सिडको एन-9 | श्रीमती लोहार | श्री कुळकर्णी पी.एस. |
| 10 | के प्रा शा सिडको एन-7 | --- | श्रीमती भुयार एच.पी. | श्री निकम एन पी |
| 11 | प्रा शा अशोकनगर | | श्री मडके | श्री लक्कस जी.डब्ल्यू |
| 12 | प्रा शा मिसारवाडी | | श्रीम. जोगदंड मॅडम | |
| 13 | प्रा शा नारेगाव | प्रा शा नारेगाव उर्दु<br>प्रा शा ब्रिजवाडी | श्री लाडके अंकुश | श्री मोकळे जी.बी. |

**समर कॅम्प 2019.......**

| केंद्र क्र. | केंद्राचे नाव | अंतर्गत शाळेचे नाव | मु.अ. चे नाव | समन्वयकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 14 | के प्रा शा मुकुंदवाडी | प्रा शा संजयनगर<br>प्रा शा विठ्ठलनगर | श्री इधाटे | श्रीमती मुळे पी.पी. |
| 15 | प्रा शा विश्रांतीनगर | -- | श्री.चौधरी सर | |
| 16 | प्रा शा चिकलठाणा | --- | श्री. सोळुंके डी.एस. | श्रीमती असमा शेख |
| 17 | प्रा शा भारतनगर नं.2 | प्रा शा भारतनगर नं.1<br>प्रा शा हनुमाननगर | श्री सुरासे सर | श्रीमती कातोरे एन.एम. |
| 18 | के प्रा शा प्रियदर्शनी इंदिरानगर | प्रा शा प्रियदर्शनी इंदिरानगर उर्दु<br>प्रा शा देवळाई | श्री राठोड | श्रीमती साक्रीकर डी.जे. |
| 19 | प्रा शा एकनाथनगर | प्रा शा मुलींची उस्मानपुरा<br>प्रा शा शहानुरवाडी | श्री संतोष तपकिरे | श्री मोरे एस.एस. |
| 20 | प्रा शा गारखेडा | प्रा शा जवाहर कॉलनी<br>प्रा शा विष्णूनगर | श्रीमती प्रतिभा कुलकर्णी | श्रीमती शिंदे मॅडम |

**समर कॅम्प 2019.......**

| केंद्र क्र. | केंद्राचे नाव | अंतर्गत शाळेचे नाव | मु.अ. चे नाव | समन्वयकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 21 | के प्रा शा बन्सीलालनगर | प्रा शा पदमपुरा | श्रीमती भडके ए.जे. | श्रीमती निकम मॅडम |
| 22 | प्रा शा सिल्कमिल कॉलनी | प्रा शा शहासोखता कॉलनी | श्रीमती शहनाज परवीन | श्रीमती कुमावत एम.एन. |
| 23 | प्रा शा पैठणगेट | प्रा शा अजबनगर<br>प्रा शा सिल्लेखाना<br>प्रा शा समतानगर | श्रीमती अलमास जोहरा | श्रीमती धमाले एस. |
| 24 | के प्रा शा इंदिरानगर बायजीपुरा | प्रा शा जिंसी-रेंगटीपुरा<br>प्रा शा रोहिदासपुरा<br>प्रा शा कैलासनगर | श्रीमती मंगला एलकटवाड | श्रीमती खरात ए.बी. |
| 25 | के प्रा शा हर्सुल | | श्रीमती ताजवे एस.आर. | श्री गावित |
| 26 | प्रा शा हर्सुल वसाहत | प्रा शा मुजफ्फरनगरप्रा शा हर्सुल उर्दु<br>प्रा शा हर्सुल जेल | श्री थोरे आर.एस. | श्री खरात एस.बी. |

समर कॅम्प 2019.......

| केंद्र क्र. | केंद्राचे नाव | अंतर्गत शाळेचे नाव | मु.अ. चे नाव | समन्वयकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 27 | प्रा शा बनेवाडी | --- | श्री तीनगोटे भरत | श्री सचिन गायकवाड |
| 28 | प्रा शा वाल्मी | प्रा शा कांचनवाडी | श्री सिरसाठ गजानन | श्री वानखेडे एस.एस. |
| 29 | प्रा शा विटखेडा | --- | श्री शिंदे पी.पी. | श्री सारस्वत बी.के. |
| 30 | प्रा शा नक्षत्रवाडी | --- | श्रीमती पाटील कल्पना | श्री चौधरी एस.एस. |

# ➢ समर कॅम्प 2019 थीम नियोजन

| दिवस | दिनांक | थीम | दिवस | दिनांक | थीम |
|---|---|---|---|---|---|
| 1 ला | 10.04.2019 | उद्घाटन | 7 वा | 16.04.2019 | स्वप्न |
| 2 रा | 11.04.2019 | फुगे | 8 वा | 17.04.2019 | कागद |
| 3 रा | 12.04.2019 | चंद्र | 9 वा | 18.04.2019 | किल्ला |
| 4 था | 13.04.2019 | पाणी | 10 वा | 19.04.2019 | खाद्यपदार्थ |
| 5 वा | 14.04.2019 | पक्षी | 11 वा | 20.04.2019 | सादरीकरण व समारोप |
| 6 वा | 15.04.2019 | काच | | | |

# :: समर कॅम्प चे नियोजन 2019 ::

| अ.क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| 1 | 19 फेब्रुवारी, 2019 | मा. आयुक्त महोदय यांच्या आदेशानुसार स्मार्ट सिटी च्या मा. अंजु मॅडम आणि मा. डॉ निधी मॅडम सोबत बैठक |
| 2 | 21 फेब्रुवारी, 2019 | शैक्षणिक गुणवत्ता गट व कला, क्रीडा व कार्यानुभव मधील सक्रीय शिक्षकासोबत कार्यशाळा |
| 3 | 22 फेबुवारी, 2019 | 21 फेब्रुवारी, 2019 च्या बैठकीमध्ये तयार केलेले उपक्रमाबाबत चर्चा |
| 4 | 09 मार्च, 2019 | गणित विषयाचे सक्रीय शिक्षकासोबत कोण-कोणते उपक्रम घेण्याबाबत व त्याची संपूर्ण माहिती तयार करणेबाबत कार्यशाळा |
| 5 | 12 मार्च, 2019 | कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन निदेशकासोबत कोण-कोणते उपक्रम घेण्याबाबत व त्याची संपूर्ण माहिती तयार करणेबाबत कार्यशाळा |
| 6 | 13 मार्च, 2019 | विज्ञान विषयाचे सक्रीय शिक्षकासोबत कोण-कोणते उपक्रम घेण्याबाबत व त्याची संपूर्ण माहिती तयार करणेबाबत कार्यशाळा |

**समर कॅम्प 2019.......**

| अ.क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| 7 | 14 मार्च, 2019 | भाषा विषयाचे सक्रीय शिक्षकासोबत कोण-कोणते उपक्रम घेण्याबाबत व त्याची संपूर्ण माहिती तयार करणेबाबत कार्यशाळा |
| 8 | 19 मार्च, 2019 | मा. आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक गुणवत्ता गटाची बैठक |
| 9 | 20 ते 29 मार्च, 2019 | सर्व विषयाचे शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी लागणारे आवश्यक मार्गदर्शक सूचना व कार्यसूचि तयार करणे |
| 10 | 30 मार्च, 2019 | समर कॅम्प केंद्र समन्वयक यांची बैठक / कार्यशाळा घेणे |
| 11 | 02 एप्रिल, 2019 | सर्व मुख्याध्यापक यांची बैठक घेणे |
| 12 | 03 एप्रिल, 2019 | इ.1ली व 2री ला शिकविणाऱ्या शिक्षकांची कार्यशाळा घेणे |

**समर कॅम्प 2019.......**

| अ.क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| 13 | 04 एप्रिल, 2019 | इ.3री ते 5वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांची कार्यशाळा घेणे |
| 14 | 05 एप्रिल, 2019 | इ.6वी ते 8वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांची कार्यशाळा घेणे.<br>समर कॅम्प बाबत चे Documentation तयार करणेसाठी बैठक घेणे |
| 15 | 06 ते 09 एप्रिल, 2019 | सदर कालावधीत समरकॅम्प साठी आवश्यक असणारे सर्व साहित्य समर कॅम्प केंद्र / शाळापर्यंत पोहच करणे |
| 16 | 08 एप्रिल, 2019 | पत्रकार परिषद आयोजित करणे. |
| 17 | 09 एप्रिल, 2019 | समर कॅम्प केंद्र व अंतर्गत शाळा स्तरावर पालकांची बैठक आयोजित करणे. |
| 18 | 10 ते 20 एप्रिल, 2019 | समर कॅम्प चे उद्घाटन व प्रत्यक्ष समर कॅम्प चे आयोजन<br>वेळ : सकाळी 7.30 ते 11.30 वाजेपर्यंत. |
| 19 | 20 एप्रिल, 2019 | समर कॅम्प चा समारोप. |


धन्यवाद!!!